महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

(A Govt. of Maharashtra Undertaking)
CIN = U40109MH2005SGC153645
४था मजला, प्रकाशगड, स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१
Tel.: 2642 2211 / 2647 2131 Fax : 022-26476749 Website : www.mahadiscom.in email : cgmpmsedcl@gmail.com

**क्र.मासं/२०२०/उ.वे.श्रे./** 0 2 0090 **दिनांक:** 26 NOV 2020

प्रति,
१. सह-व्यवस्थापकीय संचालक,
म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय,
औरंगाबाद / कल्याण
२. प्रादेशिक संचालक,
म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय,
पुणे / नागपूर

**विषय** : पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा लाभ मिळालेल्या कर्मचारी / अधिकारी यांना सा.आ. ७४ / १११ अंतर्गत उच्च वेतनश्रेणीचा लाभ देणेबाबत

**संदर्भ** : परिपत्रक क्र. मासंवि/मावक/ ७७३ दिनांक १०.०१.२०१८

संदर्भीय परिपत्रक व त्यास संलग्न महाराष्ट्र शासनाचे दिनांक २९.१२.२०१७ रोजीचे पत्र यानुसार पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमीत केल्या प्रमाणे महाराष्ट्र शासन निर्णय दि. २५.०५.२००४ अन्वये आरक्षणाचा लाभ घेवून पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीपासून प्रतिबंधीत करण्यात आले असून पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गाची रिक्त पदे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्याबाबत निर्देशीत केले आहे. रिक्त पदांअभावी पदोन्नती न मिळाल्याने सा.आ. ७४ / १११ अंतर्गत उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्यात येत असल्याने जे कर्मचारी २००४ नंतर आरक्षणाचा लाभ घेवून पदोन्नत झाले आहेत त्या कर्मचाऱ्यांना सा.आ. ७४ / १११ अंतर्गत उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयांमध्ये साशंकता आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय दि. २५.०५.२००४ मध्ये केवळ पदोन्नती करीता आरक्षणाबाबत तरतूद करण्यात आली असून मा. उच्च न्यायालयामार्फत रिट पिटीशन २७९७/२०१५ अन्वये सदर शासन निर्णय रद्य करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन निर्णय दि. २५.०५.२००४ आणि महाराष्ट्र शासनाचे दिनांक २९.१२.२०१७ रोजीचे पत्र यामध्ये उच्च वेतन श्रेणी लागू न करण्याबाबत कोणताही उल्लेख नाही. तसेच सा.आ. ७४ / १११ अंतर्गत उच्च वेतनश्रेणीचा लाभ कर्मचाऱ्यांची गतीखुंटता (De-stagnation) रोखण्याकरीता देण्यात येणारा लाभ आहे.

सबब, याद्वारे कळविण्यात येते की, जे कर्मचारी २००४ नंतर आरक्षणाचा लाभ घेवून पदोन्नत झाले आहेत त्या कर्मचाऱ्यांना सा.आ. ७४ / १११ अंतर्गत उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्याबाबत सध्याच्या प्रचलित पद्धतीनुसार संबंधीत नियम/ तरतूदींच्या अधिन राहून कार्यवाही करावी.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)**(सेवानिवृत्त)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**
संचालक(संचलन)/ (वित्त) / (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई
**प्रत सस्नेह सादर:**
१. मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., सर्व परिमंडळ कार्यालये
२. मुख्य महाव्यवस्थापक (तां.आ), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई
**प्रत रवाना:**
महाव्यवस्थापक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई